खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

## सांस्कृतिक विभाग : पाककला स्पर्धा

लोकमत

### हुतात्मा महाविद्यालयात पाककला स्पर्धा

**३०० विद्यार्थी - विद्यार्थिनींनी सहभाग घेऊन विविध स्वादिष्ट पदार्थ बनवले**

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर** : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने नवीन पाककलेचा शोध घेणे, कृतीवर आधारित शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे आणि विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकतेची जाणीव निर्माण करणे या उद्देशाने आयोजित भव्य पाककला स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. यात सुमारे ३०० विद्यार्थी - विद्यार्थिनींनी सहभाग घेऊन नावीन्यपूर्ण आणि स्वादिष्ट पदार्थ बनवले.

**विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकतेची जाणीव निर्माण करणे या उद्देशाने भव्य पाककला स्पर्धा**



अॅड.राजमाला बुट्टेपाटील यांनी पाककला स्पर्धेत सहभाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या प्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्ष अॅड.राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे, डॉ.एस.एस.जगताप, उपप्राचार्य डॉ.संजय शिंदे, प्रा.व्ही.बी. दौंडकर, डॉ.पायल ओसवाल, सांस्कृतिक समिती प्रमुख डॉ.दिलीप मुळूक उपस्थित होते. सहभागी झालेल्या विद्यार्थिनींनी पारंपरिक पाककृतींपासून फ्युजन डिशपर्यंतचे पदार्थ बनविले. केक थाळीत प्रथम जागृती नरवडे, द्वितीय सानिया सुर्वे आणि तृतीय चैताली लोणकर यांचा आला, तर पारंपरिक थाळीत प्रथम ऋतुजा मोहिते, द्वितीय सिद्धी ढवळे, अंजली मस्के आणि तृतीय सिद्धी देवधरे यांचा आला. गोड थाळीत वेदांत काळे, गौरी सणस आणि पूजा बेडकुटे यांचा अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक आला. अॅड.राजमाला बुट्टेपाटील यांनी सहभाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. परीक्षकांनी पदार्थांची चव, मांडणी आणि घटकांचा वापर यावर आधारित मूल्यमापन केले. परीक्षक म्हणून डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर, डॉ. कैलास सोनवणे यांनी काम पाहिले. स्पर्धेचे आयोजन डॉ.दिलीप मुळूक, प्रा. तृप्ती हाडके, प्रा. उषा जाधव आणि सांस्कृतिक विभागातील समिती सदस्यांनी केले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Jan 12, 2026
Powered by: erelego.com

पुढारी

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात पाककला

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात सुमारे ३०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेऊन नावीन्यपूर्ण व स्वादिष्ट पदार्थ बनविले.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टे पाटील, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एस. एस. जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, डॉ. पायल ओसवाल, सांस्कृतिक समिती प्रमुख डॉ. दिलीप मुळूक उपस्थित होते.

सहभागी झालेल्या विद्यार्थिनींनी पारंपरिक मराठमोळ्या पाककृतींपासून फ्युजन डिशपर्यंतचे पदार्थ बनवले. पाककला स्पर्धा केक, पारंपरिक व गोड अशा तीन प्रकारांत घेण्यात आली.



पाककला स्पर्धेतील स्पर्धकांशी संवाद साधताना ॲड. राजमाला बुट्टे पाटील.

केक थाळीत जागृती नरवडे (प्रथम), सानिया सुर्वे (द्वितीय), चैताली लोणकर (तृतीय) तर, पारंपरिक थाळीत ऋतुजा मोहिते, सिद्धी ढवळे, अंजली मस्के, सिद्धी देवधरे यांनी यश मिळवले. गोड थाळीत वेदांत काळे, गौरी सणस व पूजा बेडकुटे यांचा अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आला. परीक्षक म्हणून डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर, डॉ. कैलास सोनवणे यांनी काम पाहिले. स्पर्धेचे आयोजन डॉ. दिलीप मुळूक, प्रा. तृप्ती हाडके, प्रा. उषा जाधव आदींनी केले.

My Pune Gramin Edition
Jan 11, 2026 Page No. 12
Powered by: erelego.com

# राजगुरु महाविद्यालय में 300 छात्रों ने दिखाया पाककला का हुनर

भास्कर न्यूज | राजगुरुनगर



हुतात्मा राजगुरु महाविद्यालय के सांस्कृतिक विभाग द्वारा पाककला के क्षेत्र में नवाचारों को खोजने, क्रिया-आधारित शिक्षा में छात्रों की भागीदारी बढ़ाने और उनमें प्रतिस्पर्धा की भावना जागृत करने के उद्देश्य से पाककला प्रतियोगिता का आयोजन किया गया। इस प्रतियोगिता में लगभग 300 छात्र-छात्राओं ने बढ़-चढ़कर हिस्सा लिया और कई नए व स्वादिष्ट व्यंजन प्रस्तुत किए। इस अवसर पर राष्ट्रवादी कांग्रेस (शरदचंद्र पवार) पार्टी की प्रदेश उपाध्यक्ष एड. राजमाला बुट्टेपाटिल, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगले, डॉ. एस. एस. जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रो. बी. बी. दौंडकर, डॉ. पायल ओसवाल और सांस्कृतिक समिति प्रमुख डॉ. दिलीप मुलूक प्रमुख रूप से उपस्थित रहे। प्रतियोगिता में भाग लेने वाले विद्यार्थियों ने पारंपरिक महाराष्ट्रीयन व्यंजनों से लेकर आधुनिक फ्यूजन डिशेज तक पेश कीं। इस प्रतियोगिता को मुख्य रूप से तीन श्रेणियों केक, पारंपरिक थाली और मीठा (स्वीट थाली) में आयोजित किया गया था। केक श्रेणी में जागृती नरवडे ने प्रथम, सानिया सुर्वे ने द्वितीय और चैताली लोणकर ने तृतीय स्थान प्राप्त किया। पारंपरिक थाली श्रेणी में ऋतुजा मोहिते पहले, सिद्धी ढवले व अंजली मस्के दूसरे और सिद्धी देवधरे तीसरे स्थान पर रहीं। वहीं मीठा (स्वीट थाली) श्रेणी में वेदांत काले, गौरी सणस और पूजा बेडकुटे ने प्रथम, द्वितीय और तृतीय पुरस्कार जीते।

दैनिक भास्कर
Mon, 12 January 2026
https://epaper.bhaskarhindi.com/c/78

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख